**प्रेसनोट**

| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलडाणा |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र १ श्री. तुषार रमेश राणे, ३६ वर्ष, व्यवसाय नोकरी, पद— संरक्षण अधिकारी कनिष्ठ, वर्ग—३, महीला व बालविकास विभाग, मलकापुर, अतिरिक्त प्रभार संग्रामपुर जि. बुलडाणा रा. जिजामाता चौक, हनुमान मंदीराजवळ वार्ड नं. ९ ता. नांदुरा जि. बुलडाणा<br>आलोसे क्र २ श्री. जगन्नाथ तुकाराम भिवटे, वय ४० वर्ष, बहुउददेशीय कंत्राटी कर्मचारी, महीला व बालविकास विभाग, नांदुरा जि. बुलडाणा रा. मामुलवाडी ता. नांदुरा जि. बुलढाणा |
| लाच मागणी | २४,०००/—रुपये |
| लाच स्विकारली | १२,०००/—रुपये पहीला हप्ता |
| घटनास्थळ | तालुका शेतकरी खरेदी विक्री सहकारी समिती, कार्यालयासमोर, जळगाव जा. जि. बुलढाणा |
| घटना तारीख | २५.०६.२०२६ |

**थोडक्यात हकीकत:—** यातील हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांच्या मामाची मुलगी निराधार व दिव्यांग असुन तिला शासनाच्या क्रांतीज्योती बालसंगोपन योजना व शासनाच्या विशेष योजनेतुन टप्पाटप्याने ४८,०००/— रुपये आर्थीक मदत मिळालेली होती. सदरची आर्थिक मदत मिळवुन दिल्याचा मोबदला म्हणुन व भविष्यात शासनाकडुन आर्थीक लाभ मिळण्यासाठी मदत करण्यासाठी लोकसेवक श्री. तुषार रमेश राणे हे तक्रारदार यांना २४,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार लाप्रवि. बुलढाणा घटकास दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक २४.०६.२०२६ रोजी महीला व बालविकास विभाग, संरक्षण अधिकारी कार्यालय, नांदुरा येथे पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक क्र १ श्री. तुषार राणे यांनी महीला व बालविकास विभाग, संरक्षण अधिकारी कार्यालय, नांदुरा येथे नेमणुकीस असतांना तक्रादार यांची मामेबहीण हिला शासनाच्या क्रांतीज्योती बालसंगोपन योजनेतुन व शासनाच्या विशेष योजनेतुन शासनाकडुन टप्पाटप्याने ४८,०००/— रुपये आर्थीक मदत मिळवुन दिली होती त्याचा मोबदला व भविष्यात शासनाच्या योजनेतुन आर्थीक मदत मिळवुन देण्यासाठी तक्रारदार यांना २४,०००/— लाचेची मागणी करुन लाचेचा पहीला हप्ता १२,०००/— रुपये स्विकारण्यास संमती दिली व लोकसेवक क्र २ श्री जगन्नाथ तुकाराम भिवटे यांनी तक्रारदार यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहीत केले.

त्यावरुन दिनांक २५.०६.२०२६ रोजी तालुका शेतकरी खरेदी विक्री सहकारी समिती, कार्यालयासमोर, जळगाव जा. जि. बुलढाणा येथे सापळा कारवाई आयोजीत केली असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री. तुषार रमेश राणे यांना तक्रारदार यांच्याकडुन लाचेचा पहीला हप्ता १२,०००/— रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यावरून वर नमुद दोन्ही आलोसे यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन जळगाव जा. जि. बुलढाणा येथे कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

**सदरकार्यवाही :—**

१.मा.श्री.बापू बांगर,पोलीसअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावतीं,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२.मा.श्री.सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३.मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचे मार्गदर्शनाखाली श्री.रमेश पवार, पोलीस निरीक्षक श्री.विलास गुसिंगे, पोलीस निरीक्षक व सफौ शाम भांगे, पोहेकॉ प्रविण बैरागी, दिपक जाधव, अमोल झिने, जगदीश पवार, पोकॉ. लक्ष्मीकांत इंगळे ,गजानन गाल्डे, रतनगिर गिरी, प्रफुल्ल आमले, शैलेश सोनवणे, रंजीत व्यवहारे, मपोहेकॉ अनिता वारंगणे, चापोहेका नितीन शेटे, चापोकॉ. अर्शद शेख सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२—२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा — सत्यमेव जयते

(भागोजी चोरमले)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा